जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in

**-:प्रेस नोट :-** दिनांक ०६/०७/२०२६

**" जळगांव जिल्ह्यात अंमली पदार्थ कायद्यान्वये दाखल गुन्हयांपैकी ०८ गुन्हयांतील १,८६,१६,४००/- रुपये किमंतीचा एकुण ९३०.८२ किलो वजनाचा गांजा संपुर्ण प्रक्रिया पुर्ण करत नाश "**

===ooo===

**मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे,** तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक, संदिप गावीत यांनी जळगांव जिल्हयात अंमली पदार्थ विरोधी कायद्यातंगर्त दाखल गुन्हयांतील जप्त मुद्देमाल तात्काळ मा. सर्वोच्च न्यायलय, यांच्याकडील फौ.अपील क्र.६५२/२०१२ मधील निर्देश, केंद्र सरकार यांनी दिलेल्या निर्देशानुसार तसेच मा.पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई व मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, ANTF, मुंबई यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे नाश करण्याबाबत आदेशीत करण्यात आले. त्यानुशंगाने श्री. राहुल गायकवाड, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा तथा नोडल अधिकारी, अंमली पदार्थ विरोधी पथक, जळगांव यांनी अंमली पदार्थ केंद्रीय मुद्देमाल कक्ष, जळगांव येथे जमा असलेल जप्त अंमली पदार्थ मुद्देमालाचा आढावा घेतला.

संपुर्ण कायदेशिर बाबीची पुर्तता झालेल्या ०८ गुन्ह्यामधील जप्त मुद्देमाल एकुण ९३०.८२ किलो वजनाचा गांजा अंमली पदार्थ मुद्देमाल नाश करणेकामी अंमली पदार्थ मुद्देमाल नाश समिती, जळगांव यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला समितीकडुन प्रस्तुत प्रस्तावाची पडताळणी करत समितीकडुन अंमली पदार्थ मुद्देमाल नाश करणे बाबत मान्यता देण्यात आली.

**त्यानुशंगाने आज दिनांक ०६/०६/२०२६ रोजी जिल्हयाती विविध पोलीस स्टेशन अंतर्गत अंमली पदार्थ कायद्यान्वये दाखल गुन्हयांतील ०८ गुन्ह्यामधील १,८६,१६४००/- रुपये किंमतीचा एकुण ९३०.८२ किलो वजनाचा सुका गांजा हा जिल्हापेठ पोलीस स्टेशन इमारत मागील मोकळया जागेत जिल्हास्तरीय अंमली पदार्थ नाश समिती समोर संपुर्ण नाश प्रक्रियेची पुर्तता करत खड्डा खोंदुन पर्यावरणाची कमीत कमी हानी होईल या बेताने नाश करण्यात आलेला आहे. नाश प्रक्रियेचे संपुर्ण व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आलेले आहे.**

**सदरची कारवाई मा.पोलीस अधिक्षक, श्री श्रीकांत धिवरे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन जिल्हा स्तरीय अंमली पदार्थ नाश समिती मधील सदस्य मा. अपर पोलीस अधिक्षक, श्री. संदिप गावीत, मा.पोलीस अपअधिक्षक (गृह) श्री. संजय गायकवाड तसेच अधिक्षक, कृषी विभाग,जळगांव यांचे प्रतिनीधी श्री विकास बोरसे तसेच निरीक्षक वजन मापे श्री गौतम बाविस्कर यांचे उपस्थितीत पो.नि श्री राहुल गायकवाड, स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव यांचे मार्गदर्शनाखाली स.फौ. संजय दोरकर, पोहेकॉ/संदिप पाटील, पोहेकॉ/संदिप चव्हाण पोहेकॉ/जयंत चौधरी, पोहेकॉ/राहुल बैसाणे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव यांनी केली आहे.**

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव

******************************************************************************







